६४) **भविष्य निर्वाह निधी :**

भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ नुसार बँक भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात होणाऱ्या भविष्य निधी इतकीच रक्कम बँक वर्गणी निधी म्हणून जमा करेल अथवा बँकेचा हिस्सा म्हणून भविष्य निर्वाह निधी खात्याकडे पाठवेल.

६५) **सेवा शर्ती :**

संचालक मंडळ सेवकांच्या सेवाशर्ती, सेवा नियम व नियंत्रणासाठी स्थायी आदेश (Standing orders) तयार करेल व त्यामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार दुरुस्त्या करेल.

६६) **समारोप करणे :**

जर बँकेचा कारभार गुंडाळणे आवश्यक असेल तर, सदरची प्रक्रिया ही कायदा व नियम यातील तरतूदीनुसार राहील.

६७) **इतर :**

१) बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद होता येईल. याशिवाय खालील संस्थांची बँक वर्गणीदार सभासद होऊ शकेल.

अ) नागरी सहकारी बँकांचे राज्य स्तरावरील फेडरेशन

ब) नागरी सहकारी बँकांचे राज्य स्तरावरील असोसिएशन

क) प्रादेशिक / जिल्हा स्तरावरील नागरी सहकारी बँकांचे असोसिएशन

ड) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ / जिल्हा सहकारी बोर्ड

इ) इंडियन इन्स्टीट्युट ऑफ बँकर्स

फ) भारतीय बँक्स असोसिएशन

फ) भारतीय सहकारी असोसिएशन

ग) राष्ट्रीय सहकारी युनियन

ह) नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप. बँक्स ॲण्ड क्रेडीट सोसायटीज्

इ) बँकींग सेक्टरशी संबधीत असणारे इतर कोणतेही फेडरेशन/असोसिएशन/संघ /बोर्ड.

२) बँकेच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये राहिलेला दोष अथवा संचालक मंडळातील रिकामी जागा न भरणे वगैरे कारणांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभा अथवा संचालक मंडळ सभांमधील कोणताही निर्णय बेकायदेशीर ठरणार नाहीत.

अ) बँकेच्या पोटनियमातील एखाद्या पोटनियमाच्या अर्थाबाबत शंका निर्माण झाल्यास सदरची शंका निरसनासाठी मा.निबंधक यांचा सल्ला घेण्यात यावा व त्यांनी याबाबत दिलेला निर्णय हा अंतीम राहील.